


समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

परळी

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे




बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 237 | बुधवार दि. 10 सप्टेंबर 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# सी. पी. राधाकृष्णन भारताचे नवे उपराष्ट्रपती!

## इंडिया आघाडीच्या बी. सुदर्शन रेड्डी यांचा पराभव, १५ मतं फुटली



नवी दिल्ली : उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)चे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी विजय मिळवत भारताचे 15वे उपराष्ट्रपती होण्याचा मान मिळवला आहे. त्यांनी विरोधी पक्षाच्या इंडिया आघाडीचे उमेदवार न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांचा पराभव केला.

मंगळवारी पार पडलेल्या मतदान प्रक्रियेत राधाकृष्णन यांना 452 पहिल्या पसंतीची मतं मिळाली, तर रेड्डी यांना 300 मतांवर समाधान मानावं लागलं. एकूण 767 खासदारांनी मतदान केलं, त्यापैकी 752 मतं वैध ठरली तर 15 मतं अवैध ठरली. विरोधकांच्या तळात 15 मतं फुटल्याचं स्पष्ट झालं असून निकालावर त्याचा थेट परिणाम झाला. राधाकृष्णन यांचा विजय 152 मतांच्या फरकाने नोंदवला गेला. मतदान सकाळी दहा ते संध्याकाळी पाच या वेळेत पार पडले होते. काँग्रेसने प्रारंभी विरोधक एकजुटीने मतदान केल्याचा दावा केला होता, मात्र प्रत्यक्ष निकाल जाहीर झाल्यानंतर आघाडीतील एकतेला तडा गेला असल्याचे स्पष्ट झाले.

सी. पी. राधाकृष्णन हे अनुभवी राजकारणी असून त्यांचा जन्म 4 मे 1957 रोजी तिरुपूर, तमिळनाडूत झाला. वयाच्या सोळाव्या वर्षीपासून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघात कार्य सुरु केले. 1998 आणि 1999 या दोन निवडणुकांत त्यांनी कोयंबतूर मतदारसंघातून लोकसभेवर विजय मिळवला. भाजपच्या तमिळनाडू प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी राज्यात पक्षाची धुरा सांभाळली, तर नदीजोड प्रकल्प, अस्पृश्यता निर्मूलन आणि दहशतवादविरोधी चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांचा राजकीय प्रवास केवळ निवडणुकीपुरता मर्यादित न राहता त्यांनी संघटन कौशल्य आणि सौम्य नेतृत्व शैलीतून राज्यकारभारही प्रभावीपणे सांभाळला.

2023 ते 2024 दरम्यान त्यांनी झारखंडचे राज्यपाल म्हणून काम केले. याच काळात त्यांच्याकडे तेलंगणा आणि पुदुच्चेरीच्या उपराज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार होता. जुलै 2024 पासून ते महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत आहेत. दीर्घ अनुभव, प्रामाणिक कार्यशैली आणि


पान 3 वर

# नेपाळमध्ये Gen Zचं तांडव!

## उपपंतप्रधानांना, अर्थमंत्र्यांना पळवून पळवून मारलं; आंदोलकांवर गोळीबार करणाऱ्या डीएसपीची केली हत्या







नेपाळमध्ये तरुणाईच्या उद्रेकानं सध्या थैमान घातलं असून पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी राजीनामा दिला आहे. तर उपपंतप्रधान असलेल्या .... यांना तरुणांनी रस्त्यावर पळवून पळवून मारल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. त्याचबरोबर आंदोलक तरुणांवर गोळीबाराचे आदेश देणाऱ्या डीएसपीची याच तरुणांनी मॉब लिचिंग करत ठार केलं आहे. त्यामुळं नेपाळमध्ये जनरेशन झेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तरुणांचं अक्षरशः तांडव सुरु आहे. नेपाळमधील तरुणांनी विद्यमान सरकारविरोधात आंदोलन केलं आहे. त्यांनी अक्षरशः सरकारचं उलथवून टाकलं असून अनेक मंत्र्यांना या तरुणांनी 'सळो की पळो' करुन सोडलं आहे. अर्थमंत्री बिष्णू पौडेल यांना रस्त्यावरुन जात असताना आंदोलकांनी लाथ मारुन खाली पाडलं आणि पळवून पळवून मारलं. हे नेपाळमधील प्रतिष्ठीत नेते असून कम्युनिस्ट पार्टीचे उपाध्यक्षही राहिले आहेत. तसंच त्यांना पकडून घेऊन जातातानाचा व्हिडिओ व्हायरल झाल आहे.

तसंच संसदेच्या इमारतीला त्यांनी आग लावली असून काही

पान 3 वर

# आज ठळक

## माजी मंत्री.आमदार धनंजय मुंडे यांची घाटनांदुर येथील झालेल्या घटनेस सांत्वनपर भेट.



प्रतिनिधी अंबाजोगाई, घाटनांदुर अंबाजोगाई -अहमदपूर,हायवे रोड घाटनांदुर येथे दिनांक 05/09 2025 रोजी रात्री 09;30 च्या सुमारास दुकानांना आग लागली होती,त्यात कृषी अॅग्रोवन डिडवाणी यांचे दुकान,तर सोमेश्वर वडापाव सेंटर आरसुडे यांचे होते ,सिलेंडर फुटल्यामुळे आगच आग दिसत होती ,तसेच ही बात्तमी चॅनेल व वर्तमानपत्रात ही प्रकाशित झाल्या होत्या,परळी मतदार संघाचे मा.आमदार धनंजय मुंडे यांना ही घटना कळाल्यानंतर सांत्वन भेट दिली .

त्या व्यापाऱ्यांचे लाखोचें नुकसान झाले, पाहणी करुन घटनास्थळी भेट देऊन मा,आमदार धनंजय मुंडे साहेबांनी दुकान दार डिडवाणी व अरसुडे यांचे सात्वंन करून शासना कडून कशी मदत करता येईल अशी चर्चा केली ,मा.जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष शिवाजी शिरसाट तसेच घाटनांदुरचे सरपंच महेश वैजनाथ (अप्पा) गारठे,मा. सरपंच ज्ञानोबा (बप्पा) जाधव , मा. उप सरपंच बाळासाहेब देशमुख, युवा नेते गणेश देशमुख, दादा वैद्य,प्रदिप वैद्य,अतुल जाधव, शिवाजी चव्हाण,सलाम कुरेशी,उत्तम शिंगाडे,महेबुब शेख,तसेच इतर कार्यकर्ते हजर होते, नागरिक उपस्थित होते..


## मराठ्यांना कुणबी दाखले देण्यास सुरुवात करावी – मंत्रिमंडळ उपसमितीचे निर्देश




मुंबई : हैदराबाद गॅझेटसंदर्भात जारी करण्यात आलेल्या शासननिर्णयाची तातडीने अंमलबजावणी सुरु करावी, असे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीने राज्यातील विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ उपसमितीने अतिशय विचारपूर्वक निर्णय घेतले आहेत व त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. त्यामुळे शासन निर्णय मागे घेण्याचा कोणताही प्रश्न नाही, असे उपसमितीचे अध्यक्ष

पान 3 वर


# मराठा-ओबीसी आरक्षणाचा विषय होतोय लांबलचक, भुजबळांचे फडणवीसांना 8 पानी पत्र



महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. ओबीसी नेते व अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा यावरुन आपल्याच सरकारला घरचा आहेर दिला आहे. मराठा आरक्षणाबाबत कोणताही जीआर मला दाखवला नाही. तसेच महायुती सरकारने प्रचंड दबावाखाली हा जीआर काढल्याचा आरोप भुजबळांनी केला आहे.छगन भुजबळ यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीदरम्यान माध्यमांशी संवाद साधला. समता परिषदेच्या वतीने मुख्यमंत्र्यांना 8 पानी पत्र लिहिल्याचे त्यांनी सांगितले. हे पत्र आमच्या वकिलांनी तयार केले आहे. या पत्रात बराच कायदेशीर उहापोह करण्यात आला आहे. यातील मुद्दे आम्ही सरकारपुढे मांडले. मुख्यमंत्र्यांनी ते काळजीपूर्वक वाचले आहे, असं भुजबळांनी सांगितलं. पत्रातील हेच मुद्दे आता आम्हाला कोर्टात मांडता येतील. कोर्टालाही हे मुद्दे आम्ही सरकारच्या निदर्शनास आणून दिले असे सांगता येईल असं भुजबळ म्हणाले.

पान 3 वर

# 10 दिवसांत दुसरा गुन्हा! परळीत 12 वर्षांच्या मुलीवर अत्याचार, दोन अल्पवयीन आरोपी ताब्यात



परळी :शहरातील एका भागात बारा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची धक्कादायक घटना घडली आहे. सात सप्टेंबरच्या रात्री ही घटना घडली असून याप्रकरणी नऊ सप्टेंबर रोजी संभाजीनगर पोलीस ठाण्यात पहाटे चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी दोघा अल्पवयीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान 31 ऑगस्ट रोजी परळीच्या रेल्वे स्थानक परिसरात एका चिमुरडीवर अत्याचाराची घटना घडली होती. मिळालेल्या माहितीनुसार, सात सप्टेंबर रोजी रात्रीच्या वेळी पीडित मुलगी दुकानावरून घराकडे परत येत असताना 15 व 16 वर्षांच्या दोघा मुलांनी तिचा हात धरून अंधारात पानंदमध्ये नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. यावेळी त्यांच्या सोबत असलेल्या इतर दोन साथीदारांनी पीडितेला धमकावून आरोपींना मदत केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पीडितेच्या आईने 8 सप्टेंबर रोजी रात्री दिलेल्या तक्रारीनंतर 9 सप्टेंबर रोजी पहाटे चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हे विधी संघर्ष गस्त बालक असून पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे. तर दोघांचा पोलीस शोध घेत आहेत. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक धनंजय ढोणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल

पान 3 वर

### परळी पुन्हा हादरले

दरम्यान, अवघ्या 10 दिवसांपूर्वीच परळी रेल्वे स्थानक परिसरात एका चिमुकलीवर अत्याचाराची घटना घडली होती. त्यानंतर शहरातील दुसऱ्या भागात अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याने परळी शहर हादरुन गेले असून नागरिकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.


रजि.नं. BHR/AJI/RSR / 525/98-99

## स्वा. वि. दा. सावरकर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. परळी वैजनाथ.

"सुभेदार व्यापार संकुल पहिला मजला, मोंढा मार्केट, परळी वैजनाथ. ता. परळी वै. जि. बीड. 431515 फोन नं. 02446-224339

### (वार्षीक सर्वसाधारण सभा

(केवळ सभासदांसाठी)

स्वा. वि. दा. सावरकर नागरी सहकारी पतसंस्था म.परळी वैजनाथ, च्या सर्व मा. सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची वार्षीक सर्वसाधारण सभा, शुक्रवार दिनांक 26.01.2025 रोजी सकाळी ठिक 11:00 वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. यासभेत खालील विषयांवर चर्चा होवुन निर्णय घेण्यात येतील. तरी सर्व मा. सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. हि नम्र विनंती.

सभेपुढील विषय

1. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे बाबत. 2. दिनांक 01/04/2024 ते 31/03/2025 या कालावधीतील तेरीज पत्रक, नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकांचे वाचन करून झालेल्या जमा खर्चास मंजुरी देणे बाबत. 3. सन 2025-26 या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक मंजुर करणे. 4. मा. संचालक मंडळांनी सुचवलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे. 5. सन 2025-26 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्यासाठी लेखा परिक्षकाची नियुक्ती करणे व त्याचे मानधन ठरवणे बाबत. 6. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म. रा. पुणे यांचे पत्र दि. 29 जुलै 2025 अन्वये सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणेबाबत. 7. मा. अध्यक्षांचे अनुमतीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात येतील.

स्थळ :- परळी वैजनाथ.

दिनांक : 09.09.2025

सचिव
स्वाक्षरीत
जितेंद्र नव्हाडे

* सभासदांना नम्र विनंती *

1) सभेस आवश्यक असलेली गणसंख्या ठरलेल्या वेळेत नसल्यास हि सभा एक तासानंतर दुपारी ठिक 12:00 वाजता त्याच ठिकाणी सुरु करण्यात येईल. या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

1)संस्थेच्या कामकाजा विषयी काही प्रश्न विचारावयाची असल्यास संस्थेच्या कार्यालयात दिनांक 21.09.2025. पर्यंत कार्यालयीन वेळेत आणुन द्यावीत अन्यथा त्यांची दखल घेतली.


# भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जोपासत होणार साजरा

### वाढदिवसाच्या निमित्त विविध सामाज उपयोगी उपक्रम राबविणार- केशव गित्ते



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- लोकनेत्या मा ना पंकजाताई गोपीनाथराव मुंडे आणि मा खा डॉ प्रितमताई मुंडे यांचे एकनिष्ठ आणि विश्वासू भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांचा 'वाढदिवस' सामाजिक बांधिलकी जोपासत साजरा होणार आहे. त्या अनुषंगाने गुरुवार दि.11 सप्टेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. अशी माहिती राजेश भाऊ गित्ते मित्र मंडळाचे केशव गित्ते यांनी दिली आहे.

लोकनेत्या मा ना पंकजाताई मुंडे यांनी घालून दिलेल्या आदर्श संकल्पनेनुसार समाज सेवेचा वसा जोपासत समाज उपयोगी कार्यक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय राजेश गित्ते मित्र मंडळाने घेतला आहे.

वाढदिवसा निम्मित गुरुवार दिनांक 11/09/2025 रोजी सकाळी प्रभू वैधनाथ अभिषेक, निराधार व्यक्तींना अन्नदान, पर्यावरण संतुलणासाठी वरक्षारोपण, केंद्रीय प्राथमिक विद्यालय बेलंबा येथे विध्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात येणार आहे.वरील सर्व कार्यक्रमास

पान 3 वर

# वैद्यनाथ बँकेचे नवनिर्वाचित संचालक विजयकुमार वाकेकर यांचा सत्कार

### पर्युषण महापर्व महोत्सव उत्साहात साजरा



वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेचे नवनिर्वाचित संचालक विजयकुमार वाकेकर यांचा समाजबांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

येथील गाव भागात असलेल्या श्री 1008 चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिरात पर्युषण

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) पर्युषण महापर्व महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महापर्व महोत्सव उत्साहात साजरे करण्यात आले. याच कार्यक्रमात

पान 3 वर

# मो.पैगंबर यांचे तत्त्वज्ञान मानवाच्या सुख-शांतीसाठी—पोटभरे,सुर्यतळ.

### ईद-ए-मिलाद निमित्त आझाद नगर येथे विविध कार्यक्रमासह मेडिकल कॅम्प,अन्नदान.



माजलगाव ( अनंत घडसिंगे ) :- हजरत मोहम्मद पैगंबर यांचे तत्त्वज्ञान हे संपूर्ण मानवजातीच्या सुख-शांती कल्याणासाठी होते. असे प्रतिपादन बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले.तर सर्व धर्माची शिकवण ही भाईचारा प्रस्थापित करणारी असते असे मत पो.नि. सूर्यतळ यांनी मांडले.शहरातील आजाद नगर येथे ईद-ए-मिलाद निमित्त विविध कार्यक्रमासह आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त ते बोलत होते.दरम्यान

अन्नदान करण्यात येऊन

पान 3 वर

## नागपुरात साकारणार महाबोधी महाविहाराची प्रतिकृती ! संघकाया फाउंडेशनची संकल्पना



जगभरातील बौद्धांसाठी सर्वांत पवित्र असलेल्या या महाविहाराची प्रतिकृती आता आपल्या नागपुरातही साकारण्यात येत आहे.

नागपूर : तथागत गौतम बुद्धांना ज्या बोधिवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली. ते ठिकाण म्हणजे बुद्धगया होय. बिहार राज्यातील गया येथील हे ठिकाण जगभरातील बौद्धांसाठी सर्वांत पवित्र असे स्थळ आहे. याच ठिकाणी बौद्ध धम्माचा पाया घालण्यात आला. सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतर या ठिकाणी एक महाविहार बांधले. ते महाविहार आज महाबोधी महाविहार म्हणून जगभरात ओळखले जाते. जगभरातील बौद्धांसाठी सर्वांत पवित्र असलेल्या या महाविहाराची प्रतिकृती आता आपल्या नागपुरातही साकारण्यात येत आहे. जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या संघकाया फाउंडेशनने यासाठी पुढाकार घेतला आहे.

संघकाया फाउंडेशनचे अध्यक्ष भन्ते प्रशील रत्न गौतम यांची ही संकल्पना आहे. त्यांना आंतरराष्ट्रीय ध्यान केंद्र व लहान मुलांसाठी बौद्ध विद्यापीठ स्थापन करायचे होते. यासाठी त्यांनी देशभरात जागांचा शोध घेतला. अखेर त्यांचा हा शोध नागपुरात येऊन थांबला. नागपूर येथील मोहपाजवळ असलेल्या लोहगड येथे त्यांनी संघकाया फाउंडेशनचा हा प्रकल्प सुरु केला आहे. यासाठी शास्त्रज्ञ म्हणून सेवानिवृत्त असलेले डॉ. भास्कर यांनी आपली दोन एकर जागा निःशुल्क दान केली. या प्रकल्पाला त्यांनी बुद्धालॅण्ड असे नाव दिले आहे. याच ठिकाणी बुद्धगयेतील महाबोधी महाविहाराची प्रतिकृती असलेले भव्य बुद्धविहार उभारले जाणार आहे. यासाबेतच या ठिकाणी आंतरराष्ट्रीय ध्यान केंद्र आणि लहान मुलांसाठी धम्माचे शिक्षण देणारे बौद्ध विद्यापीठसुद्धा उभारण्यात येणार आहे. इतकेच नव्हे तर वयोवद्वांसाठी ओल्ड एज होमसुद्धा राहणार आहे. या ठिकाणी धम्मकार्याशी संबंधित विविध प्रकल्प राबविले जाणार आहेत. सध्या कामाला सुरुवात झाली आहे. अनेकजण प्रकल्पाला भेटसुद्धा देताहेत.

“संघकाया फाउंडेशन ही संस्था धम्माच्या शांतता, प्रेम आणि करुणेचा प्रचार प्रसाराचे कार्य जगभरात करते. यासोबतच विविध समाजोपयागी कामातही फाउंडेशन अग्रेसर असते. कोविडच्या काळात देशभारत अनेक ठिकाणी फाउंडेशनचे मदतीचे प्रकल्प राबविले. नागपूर ही खऱ्या अर्थाने बुद्धाची भूमी आहे. डॉ. बाबासाहेबांचा वारसा लाभलेल्या या भूमीतूनच बुद्धांचे विचार खऱ्या अर्थाने जगभरात पोहोचू शकतात. त्यामुळे बुद्धालॅण्ड हा प्रकल्प आम्ही येथे सुरु करतोय. बुद्धांच्या शांती आणि करुणेचा प्रचार प्रसाराचे कार्य येथून केले जाईल.”

**- भन्ते प्रशील रत्न गौतम, अध्यक्ष, संघकाया फाउंडेशन**

## शिक्षणाचा नवा प्रवासः १ ली ते १२ वी वर्गनिहाय ३४ विद्यार्थी समूह (Students Clubs) स्थापन करणे बंधनकारक

**डॉ. भारत कऱ्हाड**

शिक्षणाची खरी व्याख्या ही केवळ वर्गातल्या चार भिंतींमध्ये मर्यादित राहू शकत नाही. शाळा म्हणजे फक्त गणित, विज्ञान, इतिहास शिकवण्याचे ठिकाण नव्हे, तर मुलांना जीवनासाठी घडवण्याचे केंद्र आहे. आजच्या जगात केवळ पुस्तकातील ज्ञान पुरेसे नाही; त्याबरोबरच सामाजिक जाणीव, सर्जनशीलता, डिजिटल कौशल्ये आणि व्यावहारिक अनुभव आवश्यक आहेत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सर्व शाळांमध्ये, म्हणजे 1 ली ते 12 वी पर्यंत, विविध विद्यार्थी समूह किंवा विद्यार्थी क्लब स्थापन करणे आता बंधनकारक ठरले आहे.

ही योजना अचानक सुचलेला प्रयोग नाही. तिच्या मागे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, राज्य अभ्यासक्रम आराखडा 2024 आणि शैक्षणिक दर्जा सुधारणा कार्यक्रम पी जी आय, एसक्यूए एएफ यांचा ठोस आधार आहे. म्हणजेच हा उपक्रम स्थानिक पातळीपुरता मर्यादित न राहता संपूर्ण देशाच्या शैक्षणिक दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. सरकारचा उद्देश केवळ शालेय दर्जा उंचावणे नाही, तर मुलांच्या सर्वांगीण विकासाची हमी देणे हा आहे.

विद्यार्थी समूहांच्या स्थापनेमागे मूलभूत विचार असा आहे की मुलांना त्यांच्या आवडीनुसार, क्षमतांनुसार आणि जिज्ञासेनुसार संधी मिळावी. प्रत्येक विद्यार्थी किमान एका तरी समूहाचा सदस्य असेल. कोणाला विज्ञानाची गोडी असेल, कोणाला क्रीडेत रस असेल, तर कोणाला कला किंवा सामाजिक कार्याची आवड असेल. या सर्व मुलांना समान मंच मिळावा, त्यांनी आपली प्रतिभा ओळखावी आणि विकसित करावी, यासाठी या योजना आखण्यात आल्या आहेत.

शासनाने एकूण 34 समूहांची रुपरेषा सुचवली आहे. यात विषयाधारित समूह आहेत – मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, नागरीकशास्त्र, अर्थशास्त्र. याशिवाय क्रीडा, सांस्कृतिक, छंदिनिहाय उपक्रम, सामान्य ज्ञान, चालू घडामोडी असे गट आहेत जे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मकतेसाठी तयार करतील. आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, मानसिक क्षमता अशा गटांमुळे मुलांमध्ये सजगता आणि संवेदनशीलता वाढेल. आधुनिक तंत्रज्ञान, समाजमाध्यम व डिजिटल साक्षरता, व्यावसायिक शिक्षण, आपत्कालीन व्यवस्थापन असे गट विद्यार्थ्यांना वास्तव जीवनासाठी तयार करतील. तसेच पाककला, परसबाग, वाचन समृद्धी, खगोलशास्त्र, परकीय भाषा यांसारखे गट त्यांची सृजनशीलता आणि कल्पनाशक्ती वाढवतील.

प्रत्येक शाळेने 15 सप्टेंबर 2025 पर्यंत किमान काही समूह स्थापन करणे अनिवार्य आहे. यात विद्यार्थ्यांचा सक्तीने सहभाग अपेक्षित नाही, तर त्यांच्या आवडीची निवड महत्त्वाची आहे. मात्र, प्रत्येक विद्यार्थ्याने एका तरी समूहात सामील होणे बंधनकारक आहे. शाळांना हवे असल्यास नवीन गट सुरु करता येईल, पण तो आधीच ठरवलेल्या 34 समूहांपैकी नसावा. ही लवचिकता शाळांना स्वतःच्या गरजेनुसार नव्या संकल्पना राबविण्याची संधी देते.

अंमलबजावणीच्या दृष्टीनेही जबाबदाऱ्या स्पष्ट आहेत. मुख्याध्यापक आणि शिक्षक गट स्थापन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. गट शिक्षणाधिकारी आणि विभागीय अधिकारी नियमित आढावा घेतील. जिल्हास्तरीय डीआयईटी अधिकारी संपूर्ण जिल्ह्याचे मार्गदर्शन करतील आणि नवीन गटांना मान्यता देतील. तर राज्यस्तरावर एससीईआरटी या योजनेचे नियोजन, प्रशिक्षण आणि नियंत्रण सांभाळेल. म्हणजेच नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत सर्व पातळ्यांवर देखरेख राहील.

या योजनेतून विद्यार्थ्यांना होणारे फायदे अनेक आहेत. सर्वात पहिले म्हणजे ज्ञानविस्तार. वर्गाच्या चौकटीबाहेर विज्ञान प्रयोग, वाचन, कला सादरीकरण, सांस्कृतिक उपक्रम यामुळे मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकता येईल. दुसरे म्हणजे नेतृत्वगुण आणि संघभावना. गट चालवताना विद्यार्थी संघटन, नियोजन आणि जबाबदारी शिकतील. तिसरे म्हणजे सामाजिक जाणीव. पर्यावरण संवर्धन, सामाजिक सेवा, समता अशा मूल्यांचा अंगीकार होईल. चौथे म्हणजे डिजिटल व आर्थिक साक्षरता. आजच्या युगात तंत्रज्ञानाची समज, पैशाचे नियोजन, व्यावसायिक कौशल्ये अत्यावश्यक आहेत, ती विद्यार्थ्यांना लवकर वयातच मिळतील. पाचवे म्हणजे आरोग्य आणि क्रीडा. नियमित क्रीडा उपक्रम, स्वच्छता आणि आरोग्याशी निगडीत गट मुलांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीला चालना देतील. आणि सहावे म्हणजे सांस्कृतिक व भाषिक विविधता. विविध भाषा, कला, परंपरा जाणून घेताना विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णुता आणि बहुसांस्कृतिक दृष्टिकोन विकसित होईल.

अर्थात, या योजनेसमोर काही आव्हानेही आहेत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये पायाभूत सुविधा, प्रशिक्षित शिक्षक, ग्रंथालये किंवा प्रयोगशाळा कमी आहेत. शहरी भागात वेळेची कमतरता व विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा ताण अधिक आहे. मात्र, योग्य नियोजन, पालकांचा सहभाग, स्थानिक संस्थांचे सहकार्य आणि माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन मिळाले तर या अडचणी पार करता येतील. शासनाने या योजनांसाठी अतिरिक्त प्रशिक्षण आणि संसाधने पुरवली तर ती अधिक यशस्वी ठरेल.

या संपूर्ण उपक्रमाचा गाभा असा आहे की शाळा ही केवळ परीक्षेच्या तयारीसाठी नसून जीवनासाठी तयारीचे केंद्र आहे. विद्यार्थी समूह योजना ही त्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पायरी आहे. 15 सप्टेंबर 2025 ही अंतिम तारीख निश्चित झाली असली तरी या उपक्रमाची खरी यशस्वीता शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्या सामूहिक प्रयत्नांवर अवलंबून आहे.

शिक्षण केवळ गुणांसाठी नसते, ते जीवन जगण्यासाठी असते. प्रत्येक मुलामध्ये दडलेल्या क्षमतेचा शोध घेणे, त्याला समाजाशी जोडणे आणि सक्षम नागरिक घडवणे हे शिक्षणाचे खरे ध्येय आहे. विद्यार्थी समूह हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नाही, तर शिक्षणाच्या नव्या युगाचा प्रारंभ आहे. महाराष्ट्रातील शालेय शिक्षण अधिक जीवनाभिमुख, अनुभवाधारित आणि सर्वांगीण बनवण्याची क्षमता या योजनेत आहे, आणि म्हणूनच हा उपक्रम शिक्षणाचा नवा प्रवास ठरेल, यात शंका नाही.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवणे काळाची गरज!

एकेकाळी घरोघरी एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. त्यामुळे घरोघरी सुखी, समाधानी व आनंदी वातावरण पाहायला मिळायचे. एकमेकांच्या मदतीला धावून जाणे, एकमेकांना आर्थिक मदत करणे, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जाणे आणि एकमेकांना मायेने व आपुलकीने बोलणे हे सारे एकत्र कुटुंब पद्धतीत आपल्याला प्रकर्षाने पाहायला मिळायचे. त्याकाळी सख्ख्या भावांमध्ये प्रेम, माया व आपुलकी ठासून भरलेली होती. म्हणून तेव्हा भावंडांमध्ये कधीच आताच्या एवढे वाद-विवाद होत नव्हते. भाऊ भावाचा मनःपूर्वक आदर करत होता. एका भावावर संकट आले तर दुसरा भाऊ वाऱ्याच्या वेगाने धावून आपल्या भावाला आधार द्यायचा. एका भावाला दुःख झाले तर दुसऱ्या भावाला अतोनात वेदना व्हायच्या. छोटा भाऊ मोठ्या भावाचा आदर राखायचा. मोठ्या भावाचा विचार घेऊनच छोटा भाऊ पुढील वाटचाल करायचा. एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात असल्यामुळे आई वडील व आजी आजोबा यांचे एकत्र कुटुंबात मोलाचे योगदान असायचे. आई-वडिलांमुळे व आजी आजोबांमुळे लहान मुलांवर संस्काराची पेरणी अतिशय चांगल्या पद्धतीने व्हायची. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे एकमेकांबद्दल असणारा मायेचा ओलावा आणि एकमेकांबद्दल असणारी प्रेमाची व आपुलकीची भावना ही ठळकपणे दिसायची. लहान मुले व नातवंड आजी आजोबांच्या संस्कार छायेखाली लहानाचे मोठे व्हायचे. आजी आजोबा देखील त्यांना जिवापाड जपायचे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे शेती सुद्धा एकत्र केली जायची. त्यामुळे शेतीमध्ये शेतमाल भरमसाठ व्हायचा. शेतीमध्ये आलेली बरकत पाहून शेतकरी आनंदात न्हाऊन निघायचे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे प्रत्येक घरात व कुटुंबात एकमेकांबद्दल प्रेम, माया, आपुलकी व जिव्हाळा जणू काय मानवतेचा संदेश देत होता. घरोघरी माया, ममता व मानवता आनंदाने व सुखाने नांदत होती. एकत्र कुटुंब पद्धतीचा फायदा असा व्हायचा की, घरातील ज्येष्ठांना म्हणजेच वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर काढून वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणारे महाभाग एकत्र कुटुंब पद्धतीत अस्तित्वात नव्हते. कारण एकत्र राहिल्यामुळे माणसांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम भावना वाढीस लागते. एकमेकांबद्दल लळा लागतो आणि त्यांच्यातील असलेले नातेसंबंध अधिक घट्ट होऊन ते वेळप्रसंगी एकमेकांवर जीव ओवाळून टाकायला सुद्धा तयार होतात. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे आपल्या घरावर वाईट नजरेने बघायची कोणाची हिंमत सुद्धा होत नाही. कारण एकत्र कुटुंब पद्धती एकीचे दर्शन घडवते. पण असे एकीचे दर्शन घडवणारी एकत्र कुटुंब पद्धती हल्ली कुठेच अस्तित्वात राहिली नाही. हीच या देशाची खरी शोकांतिका आहे. एकेकाळी एकत्र असणारे कुटुंब आता विभक्त झाले आहे. कारण काळानुसार माणसांमध्ये बदल होत गेला, माणसांची नीतिमत्ता बदलली, माणूस स्वार्थी व लोभी बनला. स्वतःसाठी आणि बायको मुलांसाठी जगणे हेच त्याचे जीवन ध्येय बनले आहे. म्हणजे आजकालचा माणूस आपल्याच बायको मुलांत गुरफटून गेला आहे. त्याला घरातील सदस्य म्हणजेच आई वडील, बहिण भाऊ, आजी आजोबा आणि समाजबांधव यांचा काहीही संबंध राहिलेला नाही. फक्त आपणच कसे मोठे व्हावे आणि आपल्याच जवळ सर्वात जास्त पैसा व संपत्ती कशी गोळा होईल हा विचार आजकालचा प्रत्येक माणूस करत आहे. म्हणतात ना चुलता, भाऊ, बहिण, आई वडील आणि आजी आजोबा हेच आपले असतात. पण आपली बायको व भावाची बायको ही आपली नसते. हे कदाचित खरे आहे, कारण यांच्यासोबत आपले रक्ताचे नातेसंबंध नसते. म्हणून यांना नवऱ्याच्या घरातील सदस्य नको वाटतात. मग मित्रहो, या बाया काय करतात? आपल्या नवऱ्याला भावाबद्दल, बहिणीबद्दल, आई-वडिलांबद्दल व आजोबांबद्दल भलतेच काहीतरी लावून देतात किंवा त्यांचे कान भरतात. आणि आपल्या पतीच्या नातेवाईकांबद्दल त्याच्या मनात द्वेष व तिरस्कार निर्माण करतात. आपल्या पतीला एकाचे दोन लावून देतात. आणि आजकालची मुले पत्नीचे ऐकून आई-वडिलांना, भावांना व आजी-आजोबांना अंतर देऊन एकत्र कुटुंब पद्धतीला छेद देऊन विभक्त कुटुंब पद्धतीचा अवलंब करत आहेत. आपल्या बायको मुलांना घेऊन कुठेतरी लांब नोकरीच्या ठिकाणी म्हणा किंवा शहरी भागात स्थायिक होऊन मनसोक्त राहतात. आणि पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. ही वस्तुस्थिती सध्या आपण सर्वजण पाहत आहोत. कारण हल्ली माणसाचे मन कलुषित व गढूळ पाण्यासारखे झाले आहे. कारण आजकालच्या मुलांना शालेय शिक्षण म्हणावे तेवढे संस्कारक्षम व दर्जेदार मिळत नाही. शाळेत केवळ अभ्यासक्रम शिकवला जातो, अभ्यास क्रमाशिवाय इतर ज्ञानसंपदा किंवा संस्काराचे धडे आजकाल कोणत्याच शाळेत वा महाविद्यालयात दिले जात नाहीत. शिक्षक विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महत्त्व पटवून देत नाहीत. आई-वडिलांचे व आजी आजोबांचे महात्मे सांगणारे धडे आजकाल पुस्तकात समाविष्ट करणे काळाची गरज आहे. आई-वडिलांना अंतर देणे, त्यांना वृद्धाश्रमात पाठवणे, बहिण भावाचा शुल्लक कारणावरून अबोला धरणे आणि गुंठाभर जागेसाठी आपल्याच भावासोबत भांडण तंटा करणे हे सध्या सर्वत्र सर्रास सुरु आहे. याचे एकमेव कारण म्हणजे आजकालच्या पिढीला कुठेतरी संस्कार कमी पडलेत आणि त्यांना संस्कार देणे आणि त्यांना नात्याचे महत्त्व सांगणे ही सध्या काळाची गरज आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महात्मे सांगणारा आणि त्यांना संस्काराचे धडे देणारा अभ्यास पुस्तकात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त चांगला सुसंस्कारी नागरिक बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. एकत्र कुटुंब पद्धतीचे महत्त्व पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांसाठी समाविष्ट करून विद्यार्थ्यांना चांगला माणूस बनवून आई-वडिलांना, आजी आजोबांना, बहिण भावांना व समाज बांधवांना अडीअडचणीत, सुखदुःखात, कठीण काळात व संकटात मदत करणे हे आपले परम कर्तव्य आहे. आजी आजोबा संस्काराची खान असतात. आजी आजोबांना कधीच अंतर देऊ नका, त्यांच्या विचारांना व आचारांना आचरणात आणून माणसासारखे जीवन जगूया... त्यासाठी एकाच घरात, एकाच छताखाली आणि शेत वाटणी न करता सगळ्यांनी मिळून सर्व शेती एकत्र करावी...बुद्ध, फुले शाहू, आंबेडकरांचे विचार आचरणात आणून एकत्र कुटुंब पद्धतीला महत्त्व द्यावे, सुरुवात आपल्यापासून करुया म्हणजे आपोआप आपली प्रेरणा घेऊन प्रत्येक जण एकत्र कुटुंब पद्धतीला प्राधान्य देईल असे मला वाटते....

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.7498715661**

## अल्ताफ मसूद कुरेशी यांची भारतीय नौदलात निवड – घाटनांदूर गावात जल्लोष



ग्रामीण प्रतिनिधी घाटनांदुर अंबाजोगाई : घाटनांदूर गावातील तरुण अल्ताफ मसूद कुरेशी यांची भारतीय नौदलात (Indian Navy) निवड झाल्याची बातमी समजताच गावभर आनंदाची लाट उसळली. गावकऱ्यांनी फटाके फोडून व गुलाल उधळून स्वागत केले. “अल्ताफच्या मेहनतीमुळे गावाचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकणार आहे,” असा अभिमान ग्रामस्थांनी व्यक्त केला.

सत्कार समारंभात मान्यवरांचे मार्गदर्शन-अल्ताफच्या यशाचा गौरव करण्यासाठी गावात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. ओमप्रकाश शेटे होते. त्यांनी भाषणात सांगितले “शिक्षण, कष्ट आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर तरुणांनी संधी मिळवाव्यात. अल्ताफने दाखवून दिले की जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणतेही ध्येय दूर नाही. भविष्यातही गावाचे नाव अधिक उज्ज्वल करा.”गावाचे सरपंच म्हणाले “मोकळा वेळ वाया घालवणाऱ्या तरुणांनी अल्ताफचा आदर्श घ्यावा. सरकारी नोकऱ्या, संरक्षण दल, पोलीस, अभियंता क्षेत्र—सर्वत्र संधी उपलब्ध आहेत.”हाफिज खालिक कुरेशी यांनी सांगितले“अल्ताफचे यश केवळ कुटुंबापुरते मर्यादित नसून संपूर्ण समाजासाठी अभिमानास्पद आहे. हे यश युवकांसाठी प्रेरणादायी आहे.”सुरेश मिसाळ सरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन सुरेश मिसाळ सरांनी आपल्या भाषणात सांगितले“जिस बाप का बेटा लायक होता है, उस बाप की इज्जत होती है. पालकांनी मुलांना योग्य दिशा दिल्यास अशा यशस्वी घडामोडी घडतात. त्यामुळे पालकांचे नाव उज्ज्वल होते.”यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रसिद्ध विचार उद्धृत केले “शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे; जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहत नाही.”याचा खरा आशय स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की –“गुरगुरणे” म्हणजे केवळ आक्रमक होणे नव्हे, तर शिक्षणामुळे आत्मविश्वासाने उभे राहणे, यश संपादन करणे, आपला उद्धार करणे आणि समाजात मान-सन्मान मिळवणे हा डॉ. बाबासाहेब यांना अभिप्रेत होता.“गावातील तरुणांनी एकत्रित प्रयत्न करून घाटनांदूरच्या प्रगतीसाठी काम करावे.” यावेळी कौशल्यविकास, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, सैन्य व पोलीस भरती शिबिरे, क्रीडा आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त झाले.यावेळी गावातील ॲड. वैशाली धनाजी देशमुख यांची नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून झालेली नियुक्तीही गौरविण्यात आली.या कार्यक्रमाला इरफान भैय्या कुरेशी, बीलाल भैय्या, शफीक कुरेशी, खालेक कुरैशी, मुस्तकीम कुरैशी, तंटामुक्त समिती अध्यक्ष मुख्तार शेख, उमर शेख, मेहबूब शेख, गफ्फार कुरैशी, जब्बार कुरैशी, लायक कुरैशी, शकील कुरेशी, अरबाज कुरैशी, इस्माईल कुरेशी, वसीम कुरेशी, जावेद भैय्या कुरैशी, आसिफ कुरेशी, नफीस कुरेशी, वाजिद शेख, सद्दाम शेख, उत्सव जाधव, गणेश जाधव, सूरज ताटे, बालाजी मिसाळ यांसह गावातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गफार मास्टर यांनी .

## सभापती जयदत्त नरवडे यांना पितृशोक



माजलगाव, प्रतिनिधी : तालुक्यातील सुलतानपुर (माळेवाडी) चे माजी सरपंच व प्रगतशिल शेतकरी म्हणुन ओळख असलेले सुभाषराव नरवडे यांचे वयाच्या 75 व्या वर्षी अल्पशा आजाराने दि. 9 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 8.00 वाजता छत्रपती संभाजीनगर येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले.

सुभाषराव नरवडे हे प्रगतशील शेतकरी तसेच मनमिळावु स्वभावाचे मितभाषी व्यक्तीमत्व असल्याने पंचक्रोषित परिचीत होते. त्यांच्या पार्थीव देहावर सुलतानपुर (माळेवाडी) येथे सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांचे ते वडील होत

## परळी नगरपालिका अंतर्गत भीम नगर येथील अमोल अवचारे ते सुगंध कुटी बुद्ध विहार येथील काम इस्टिमेट प्रमाणे करण्यात यावे. बालासाहेब जगतकर



परळी प्रतिनिधी-- परळी नगरपालिका अंतर्गत भीम नगर येथील अमोल अवचारे ते सुगंध कुटी बुद्ध विहार येथील रोडचे काम एस्टिमेट प्रमाणे करण्यात यावे अशी येथील नागरिकांतून मागणी होताना दिसत आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी नगरपालिके अंतर्गत सध्या भिम नगर जगतकर गल्ली येथील अमोल अवचारे ते सुगंध कुटी बुद्ध विहार पर्यंत रोडचे काम चालू असून ते एकदम निकृष्ट दर्जाचे होत असून इस्टिमेट प्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकानुसार होत नसून ते आतुर मातुर होत आहे अशी येथील नागरिकाची मागणी असून सदरील काम हे इस्टिमेटप्रमाणे करण्यात यावे असे संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले असता ते उडवा उडवी ची उत्तरे देत असून त्याची चौकशी करून लवकरात लवकर ते काम बंद करून इस्टिमेट प्रमाणे करण्यात यावे. अन्यथा माननीय जिल्हाधिकारी माननीय विभागीय आयुक्त व संबंधितांनाही लेखी निवेदन देऊन तक्रार करणार असल्याची माहिती हि बालासाहेब जगतकर यांनी दिली आहे

## कोल्हेवाडी येथे शासकीय जागा हडपण्यासाठी सरपंचा सह ग्राम पंचायत सदस्यांना जिवे मारण्याची धमकी - दखल घेण्यासाठी तहसिलदार यांना दिले निवेदन



केज ( बाबुराव तिडके ) केज तालुक्यातील कोल्हेवाडी हे गाव सर्व लोक गुण्या - गोविंदाने राहातात परंतु निवेदणात दिलेली नावे - संजय शंकर डांगे व वैभव संजय डांगे हे दोघे अंगणवाडी शासकिय कामे चालु असलेल्या ठिकाणी येऊन अडथळा निर्माण केला त्यांना समजाऊन सांगितले परंतु दंडेलशाही / दादागिरीची भाषा वापरुन कोल्हेवाडी गावच्या सरपंच सौभाग्यवती प्रेमाला नंदुलाल मिसाळ यांच्या सह उपसरपंच श्री श्रीराम खांडेकर व ग्रामपंचायत सदस्य सौ स्नेहा मिसाळ श्री कृष्णा आघाव सौ राधाबाई आघाव यांच्यासह गाव पंचांना शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या या गाव लोकप्रतिनिधी लोकांनी तहसिल कार्यालय केज गटविकास अधिकारी पंचायत समिती केज ग्रामिण पोलिस स्टेशन केज यांना रितसर निवेदन देऊन या धमक्या देणाऱ्या दोघांवर शासकिय कामात अडथळा आणुन गाव प्रथम नागरिकांसह महिला सरपंच व सदस्यांना जिवे मारण्याची धमकी देऊन शासकिय जागा अंगणवाडी सह हडप करण्याचा त्यांचा मानस असल्याने त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी केज तालुका प्रशासनाला लेखि निवेदनादवारे केलेली आहे वेळीच प्रशासनाने दखल घेतली नाही तर कोल्हेवाडी गावामध्ये कायदा सु - व्यावस्थेचा गंभिर प्रश्न उदभऊ शकतो याची तात्काळ दखल घ्यावी अशी मागणी गावच्या सरपंच सौ प्रेमाला मिसाळ यांनी केज प्रशासनाकडे केली आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

संघटनकौशल्यामुळे राधाकृष्णन हे भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे विश्वासार्ह नेते मानले जातात.

आता उपराष्ट्रपतीपदाची धुरा त्यांच्या खांद्यावर आली आहे. या पदासोबतच ते राज्यसभेचे सभापती म्हणूनही कार्यभार सांभाळणार आहेत. त्यामुळे संसदेत सभागृहाचं सुचारू संचालन, विरोधकांशी संवाद आणि राष्ट्रीय प्रश्नांवर समन्वय साधण्याचं मोठं दायित्व त्यांच्यावर येणार आहे. विरोधी पक्षाच्या पंधरा मतांच्या फुटीमुळे हा विजय एनडीएसाठी सोपा झाला असला तरी पुढील काळात राधाकृष्णन यांच्या नेतृत्वशैलीतून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कितपत सुसंवाद घडवून आणला जातो याकडे साऱ्यांचे लक्ष लागणार आहे.

---

मंत्र्यांची घरंही पेटवून दिली आहेत. त्याचबरोबर उपपंतप्रधान यांनाही मारहाण करण्यात आली असून पंतप्रधानांनी तर गुपचूप राजीनामा देऊन लष्कराच्या हेलिकॉप्टरमधून पळ काढला आहे. त्याचबरोबर राष्ट्रपतींनीही आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.तसंच आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी सगळीकडं जाळपोळ सुरु झाल्यानंतर त्यांच्यावर पोलिसाकंडून सुरुवातीला अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. पण त्याचाही आंदोलक तरुणांवर काहीही परिणाम होत नसल्याचं लक्षात आल्यानंतर पोलिसांनी थेट गोळीबार केला. यामध्ये 20 हून अधिक तरुणांचा मृत्यू झाला. या गोळीबाराचे आदेश द्या डीसीपींनी दिले त्या पोलिस अधिकाऱ्यालाही नेपाळच्या आंदोलक तरुणांनी पकडलं आणि त्यांना सर्वांनी मिळून बेदम मारहाण केली. या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला.

---

व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

राज्यातील सामाजिक ऐक्य कायम रहावे, यासाठी फडणवीस यांच्या भूमिकेनुसार उपसमिती काम करीत असून मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेवून गैरसमज दूर केले जातील. यासंदर्भात कोणताही दुराग्रह नसून उपसमितीने चर्चेची दारे खुली ठेवली आहेत, असे विखे-पाटील यांनी स्पष्ट केले.

---

2 सप्टेंबर रोजी सरकारने जीआर काढला. त्यावेळी ओबीसीतील 350 हून अधिक जातींवर कोणताही अन्याय होणार नाही याची काळजी सरकारने घ्यायला हवी होती. पण ती काळजी सरकारने घेतली नाही. ओबीसींवरील अन्याय टाळण्यासाठी एकतर हा जीआर मागे घ्या किंवा त्यात योग्य ती सुधारणा करा अशी मागणी भुजबळांनी यावेळी केली.कुणबी आणि मराठा हे दोन समाज वेगळे आहेत. एसईबीसी अंतर्गत मराठा समाजाला शिक्षण व नोकऱ्यांत 10 टक्के आरक्षण सरकारने दिले आहे. हा समाज शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागास असू शकतो. पण तो सामाजिकदृष्ट्या मागास नाही. त्यामुळे त्यांचा ओबीसीत समावेश करणे साफ चुकीचे असल्याचे भुजबळ म्हणाले.जीआरमधील 'मराठा समाज' या शब्दावर आमचा आक्षेप आहे. त्यांनी मराठा समाजाचा उल्लेख करताना तो ओबीसी किंवा कुणबी अथवा मराठा कुणबी किंवा कुणबी - मराठा असा करायला हवा होता. पण त्यांनी हा शब्दप्रयोग टाळला. 'मराठा समाज' हा शब्द वापरला असं भुजबळ म्हणाले.सरकारने जीआर काढताना सुप्रीम कोर्ट व हायकोर्टाने यासंबंधी दिलेल्या अनेक निर्णयांना बाजुला ठेवलं आहे. इतकच नाही तर सरकारनेही आपल्याच यापूर्वीच्या प्रक्रियेलाही यातून तिलांजली दिली आहे. सरकारने ओबीसी समाजात कुणाचा समावेश करायचा यासंबंधी काही नियम केले होते. ते नियम देखील या प्रक्रियेत डावलण्यात आले आहेत. 2000 व 2012 च्या कायद्यात ओबीसी कसे ठरवायचे? याचे काही नियम असून तेही यात पाळण्यात आले नाही, त्यातून संभ्रमावस्था निर्माण झाल्याचं भुजबळ म्हणाले.

---

शिंदे तसेच अंबाजोगाई येथील पिंक पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधवर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

---

मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राजेश भाऊ गित्ते मित्र मंडळाचे अध्यक्ष केशव गित्ते यांनी केले.

---

वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळात विजयी झाल्याबद्दल येथील उद्योजक विजयकुमार वाकेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिगंबर जैन मंदिरचे अध्यक्ष ओमप्रकाश मुळजकर, उपाध्यक्ष महावीर महालिंगे, मयूर मुळजकर, संतोष जैन, महावीर संघई आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

वैद्यकीय शिबिरही घेण्यात आले.तत्पूर्वी

अहले सुन्नतवल जमाअत कमीटी कडून शहरात मोठी मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर जयंती अध्यक्ष सय्यद सलीमबापू,श्रीहरी मोरे,तालेब चाऊस,डॉ. तौसीफ, सुभाष नाकलगावकर,सुशांत पौळ, यांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की,मो.हजरत पैगंबरांनी समाजात समानता,दया बंधुता,न्याय,सद्भावनेचा संदेश दिला. त्यांनी गरीब,अनाथ,विधवा व वंचित घटकांच्या हक्कासाठी लढा देत सामाजिक न्याय प्रस्थापित केला आहे.संपूर्ण जगासाठी दया हा त्यांचा संदेश आजच्या काळातही तेवढाच महत्त्वाचा असल्याचे पोटभरे यांनी अधोरेखित केले.तर सर्व धर्माच्या शिकवणीचा अंतिम उद्देश समाजात भाईचारा निर्माण करण्यासाठी असल्याचे पो.नि.राहुल सूर्यतळ यांनी सांगितले.दरम्यान या कार्यक्रमास विविध धर्मीय नागरिकांची उपस्थिती होती.उपस्थितांनी पैगंबरांच्या शिकवणीचे स्मरण करून समाजात ऐक्य,प्रेम व शांती नांदावी,अशी एकमुखी भावना व्यक्त केली.तत्पूर्वी सकाळी नऊ वाजता शहरात जल्लोषात आणि उत्साहात भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी मिरवणूकित सहभागी असणाऱ्या भाविकांनी हिरव्या झेंड्याच्या पताका उंचावत धार्मिक घोषणाबाजी केली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यांच्यासह सय्यद सिराजोद्दीन कादरी.सय्यद युसुफोदीन कादरी,आगा खान साहब.शेख महेबुब.शेख मुस्तकीम. सय्यद रईसोद्दीन कादरी.मिर्झा महेमुद.शेख आसेफ,सय्यद रहीम फिटर.सय्यद समीर.सय्यद मुदस्सीर.शेख हारून फिटर.शेख अख्तर.शमशेर पठाण.सय्यद तौफिक. शेख फेरोज,सय्यद अली खतीब आसेफ.शेख महेबुब.सय्यद शफिक भाऊ.शेख इलियास.शेख गुलाब.शेख चुन्नु.सय्यद तौफिक कादरी.सय्यद फारुख अण्णा, तौफिकसह सर्व अहले सुन्नतवल जमाअत कमीटी माजलगाव यांनी पुढाकार घेतला.

---

## पान 4 वरुन

बीड जिल्हामध्ये प्रामुख्याने परळी पोलीस आपल्या कर्तव्यात कसूर करीत असल्यामुळे परळी शहरामध्ये गुन्हेगार लोकांवर पोलिसांचा वचक राहिलेला नाही. परळी पोलिस नको त्या बाबींमध्ये व्यस्त असल्याने रात्री दिलेल्या ड्यूट्या ते सक्षमपणे बजावत नसल्यामुळे गरीब कुटुंबावर अशी बिकट वेळ आली आहे. जे पोलीस रात्री ड्युटीवर असताना मुलींवर अत्याचार झाला. त्या गुन्ह्यात पोलिसांना ही सहआरोपी करा तसेच पीडित कुटुंबाचे तत्काळ पुनर्वसन करून त्यांना शासकिय सेवेत समाविष्ट करा. आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, सदर प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात व्हावी, या मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदन शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रशासनाला देण्यात आले. अंबाजोगाईकरांनी दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या माध्यमातून काढलेल्या निषेध मोर्चात मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे तसेच श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी, विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांचे नेते, प्रमुख कार्यकर्ते, पत्रकार, समाजसेवक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, युवती आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

---

लागू करत आरक्षण देण्याचे काम केले मात्र त्या गॅझेटमध्ये बंजारा समाजाची एसटी प्रवर्ग म्हणून नोंद असून इतर राज्यात बंजारा बांधवांना एसटी प्रवर्गाचा लाभ दिला जातो मग महाराष्ट्र सरकारकडून का नाही? असा सवाल करत जिल्ह्यातील बंजारा बांधकडून मोर्चाची पूर्व दिशा ठरविण्यासाठी भव्य बैठक घेण्यात आली. या बैठकीला व्यापक स्वरूप आल्याचे दिसून आले. पंधरा ते वीस हजार संख्येने जिल्ह्यातील बंजारा बांधव शहरातील सौभाग्य लॉन्स येथे उपस्थित राहिले. मात्र जागा अपुरी पडल्याने रस्ता पूर्ण जाम झाला होता. बैठकीची कसलीही कल्पना प्रशासनास देण्यात आलेली नव्हती परंतु शहरात दाखल होणारे बंजारा बांधव पाहून पोलीस प्रशासन अलर्ट होत बंदोबस्त तैनात करण्यात आले.बंजारा (लमाण) समाज मराठवाडा विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास आहे. ऐतिहासिकदृष्ट्या व प्रशासकीय नोंदीनुसार आदिवासी समाजामध्ये आहे. तथापि मराठवाडा महाराष्ट्रात सामिल झाल्यावर सन 1956 नंतर या समाजाला ओबीसी / एनटीसी प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले. परंतु तेलंगणा व आंध्र प्रदेशात याच गॅझेटचा आधार घेऊन बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. संघर्षयोध्दा श्री. मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर शासनाने मराठा समाज बांधवांना दि.02 सप्टेंबर 2025 च्या शासन निर्णयानुसार हैद्राबाद गॅझेटियर लागू केले. शासन स्तरावर हैद्राबाद गॅझेटियर अधिकृतपणे स्विकारले व अंमलात आले असल्यामुळे त्याचा आधार घेऊन मराठवाड्यातील बंजारा (लमाण) समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गात सामिल करून त्यांना या प्रवर्गातील आर-क्षणाचा लाभ देण्याची मागणी करत जिल्ह्यातील बैठकीला तसेच मोर्चाला आमदार विजयसिंह पंडित यांनी पाठिंबा दिला.बीड शहरातील सौभाग्य लॉन्स येथे जिल्ह्यातील बंजारा बांधवांची आरक्षण लढाईच्या मोर्चा संदर्भात बैठक बोलवण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील बंजारा बांधव एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने शहरातील अंबिका चौक पांगरी रोड कॅनल रोड नगर रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावरील ट्राफिक एक तास जाम झाली होती. यावेळी तत्काळ पोलिस प्रशासनाकडून दखल घेत बैठकीनंतर रस्ता मोकळा करण्यात आला.

---

दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील दौऱ्यादरम्यान प्रा. हाके आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांत मोठा राडा झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण जिल्ह्यात आंदोलन, मोर्चे व सभा यावर प्रतिबंध लावत मनाई आदेश जारी केले होते. दरम्यान, पुन्हा दोन दिवसांपूर्वी प्रा. लक्ष्मण हाके यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात पुन्हा एकदा तणावाचे वातावरण निर्माण झाले. दि. 7 सप्टेंबर रोजी गेवराई पोलिस ठाणे हद्दीतील तलवाडा फाटा परिसरात मोठ्या संख्येने नागरिकांनी जमाव जमवला. यावेळी झेंड्याच्या दांड्यांचा वापर करून एका चारचाकी वाहनाची तोडफोड करण्यात आली. या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेला गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण झाला. या प्रकरणी गेवराई पोलिसांनी नऊ जणांविरुद्ध मनाई आदेशाचे उल्लंघन व तोडफोडीचे गुन्हे दाखल केले असून त्यात शुभम शेंडगे, दत्ता चोरमले, अशोक शेंडगे, राजेंद्र शेंडगे, हनुमान मुकुटराव, दत्ता शेंडगे, निळकंठ पंडित, ज्ञानेश्वर धूमाळ अशी आरोपींची नावे पोलिस तपासात पुढे आल्याने चौकशी सुरु आहे.

---

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, "वृक्षलागवड ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून, ती सातत्याने राबविण्याची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्विकारली, तर हरित बीडचे स्वप्न नक्कीच साकार होईल." या कार्यक्रमास राष्ट्रीय महामार्गाचे उपविभागीय अभियंता श्री. राजेंद्र भोपळे, नगरपालिका सहआयुक्त श्री. संभाजी वाघमारे, नगर परिषद मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी आणि श्री. योगेश क्षीरसागर यांची देखील उपस्थिती होती. तसेच स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. पुढील काही महिन्यांत संपूर्ण शहरात ही वृक्षलागवड मोहीम राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे.

---

अनेक विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करून शासकीय सेवेत रुजू झाले आहेत. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये करिअरविषयी जागृती निर्माण करून उज्वल भविष्याची बीजे पेरण्याचे कार्य त्यांनी केले आहे.त्यांच्या या प्रेरणादायी कार्याचा गौरव म्हणून त्यांना "आदर्श शिक्षक पुरस्कार 2025" प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे परळी नगरीसह संपूर्ण बीड जिल्हा अभिमानाने उजळून निघाला आहे.

---

मन, वाणी व कर्माने शुद्ध राहून कथा ऐकली, तरच जीवनात शांतता आणि मोक्षाची अनुभूती मिळते असे त्या म्हणाल्या.कीर्तनावेळी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. महिला वर्ग विशेष उत्साहाने सहभागी होत भजन-गायनात मनसोक्त रमेल्या. जनक महाराज कदम यांच्या पहाडी आवाजाने व अशोक भारस्कर यांच्या तबलावादनाच्या गजरात भागवत कथेत परिसर दुमदुमून गेला. वातावरणात भक्तिरस दरवळत असतांना अनेक भाविकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण मंडळी व लहान मुले यांचा सहभागही लक्षणीय होता.या दिवशी दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भाविकांच्या उपस्थितीमुळे श्री हनुमान मंदिर परिसर गजबजून गेला होता. भागवत कथेच्या दुसरा दिवसासाठी ग्रामस्थांमध्ये मोठी उत्सुकता असून, उद्या अधिकाधिक भाविक सहभागी होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

---

काही सीमा-मर्यादाच राहिलेली नाही. प्रचंड हाल अपेष्टा नागरिक सहन करत आहेत. या अनुषंगाने जिल्हाधिकारी साहेब, एस. पी. साहेब व मुख्याधिकारी नगरपरिषद यांना या मागण्यांचे निवेदन देण्यात आलेले आहे , *शहरांमध्ये सर्व रस्त्यांवर पार्किंग-मार्किंग पांढऱ्या पट्ट्या तसेच ट्रॅक मार्किंग पांढऱ्या पट्ट्या तात्काळ मारण्यात याव्यात.* ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार पार्किंग व नो पार्किंगचे बोर्ड कायमस्वरूपी लावण्यात यावेत.* सर्व जुन्या नव्या अधिकृत रिक्षा थांब्यांवर अधिकृत पार्किंगचे तसेच वाहन संख्या मर्यादेचे बोर्ड लावण्यात यावेत.* शहरातून जाणारे सर्व मुख्य हायवे व अंतर्गत रस्ते यावर आवश्यकतेप्रमाणे तसेच दुभाजक व्यवस्थेच्या नुसार तात्काळ सिग्नल लावण्यात यावेत व चालू करण्यात यावेत.* शहरांमध्ये रोज फिरणारे नियमित अतिक्रमण पथक तसेच नो पार्किंग पथक चालू ठेवण्यात यावे.* मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा.* नगर रोड परिसरामध्ये सर्व शासकीय कार्यालयांच्या व आस्थापनांच्या समोर पार्किंग व नो पार्किंगचे नियोजन करण्यात यावे आदरणीय कोर्ट इमारतीच्या समोर व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर यू'टर्न देण्यात यावेत.* शहरातील नियमित सफाई व कचरा व्यवस्थापनासाठी कमीत कमी नव्या 4 ते 5 जे.सी.बी. मशीन्स व 50 घंटा गाड्यांची तात्काळ गरज आहे तरी शासनाने त्या उपलब्ध करून द्याव्यात. नियमित सफाई मोहीम चालू ठेवण्यात यावी. *शहरात सर्व भागांमध्ये रोग प्रतिबंधात्मक औषध फवारणी तात्काळ करण्यात यावी व नियमित चालू ठेवावी.*मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा.* शहरातील सर्व भागातील पथदिवे तात्काळ वाढवण्यात यावेत. याचा अहवाल नुकताच काही दिवसांपूर्वी नगरपालिकेला दिलेला आहे.* नगरपालिकेने दिलेल्या दिनांक 14/8/2025 रोजीच्या पत्रानुसार पत्र क्रमांक आवक जावक क्रमांक 3299 नुसार धानोरा रोड भागातील खड्डे मुरुम टाकून तात्काळ बुजवण्यात येणार होते. तरी अद्यापही खड्डे बुजवण्यात आलेले नाहीत. तरी अंकुश नगर व धानोरा रोड परिसरातील रस्त्यावरील सर्व खड्डे तात्काळ बुजवण्यात यावेत.*शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्याची दुरावस्था झालेली आहे तरी सर्वच भागातील रस्त्यांवरील खड्डे मुरुम टाकून तात्काळ बुजवण्यात यावेत. जिल्हाधिकारी साहेब, एस पी साहेब मुख्याधिकारी साहेब यांना निवेदन देण्यासाठी बीड शहर बचाव मंच, एस डि पी आय. पार्टी व कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने, कॉम्रेड प्राचार्य डी जी. तांदळे सर, कॉम्रेड नितीन जायभाये, कॉम्रेड भाऊराव प्रभाळे, ॲड.अनिल बारगजे, ॲड.नितीन वाघमारे, बाजीराव ढाकणे, मा.न से. सय्यद फारूक, संपादक/पत्रकार साहस ओदाडे, एस डी पी आय. पार्टीच्या वतीने शेख अब्दुल कादर महासचिव सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्हा,कलीम ईनामदार जि.समिति सदस्य, एजास चौधरी ज़ि.समिति सदस्य, काज़ीतक़ीउद्दीन,आदिल भाई आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

---

विभागाचे पोलिस जमादार बाळासाहेब अहंकारे व नागरगोजे यांनी धारूर येथील वनविभागाशी संपर्क साधला आणि या घटनेची माहिती दिली. त्यानंतर वनसेवक वचिष्ठ भालेराव आणि जीवनसिंग गोके यांनी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ही माहिती पशुधन अधिकारी डॉ. थळकरी यांना दिल्या नंतर त्यांनी शवविच्छेदन केले. या प्रकरणी वनविभागाचे अधिकारी अधिक तपास करीत आहेत. रस्त्यावर ज्या ठिकाणी हरिणाचे मुंडके आणि मांस सापडले त्या ठिकाणी गती रोधक असल्याने कुणी तरी हरिणाची शिकार करून मांस आणि मुंडके दुचाकी वरून घेऊन जात असावे, परंतु रस्त्यावर असलेल्या गतिरोधकावर गाडी आदळल्याने ते खाली पडले असावे आणि कोणी पाहील म्हणून त्यांना चुकविण्यासाठी शिकारी पळून गेला असावा, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

---

निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने काही दिवसांतच खड्डे पूर्ववत दिसू लागले आहेत. याचा फटका थेट दुचाकीस्वारांना बसत असून, अनेक लहानमोठे अपघात घडत आहेत. नागरिकांचा जीव धोक्यात घालून प्रशासन केवळ कागदोपत्री काम करत असल्याची भावना लोकांमध्ये व्यक्त होत आहे.दररोज रस्त्यावरून शाळकरी मुलं, कामगार, महिला व ज्येष्ठ नागरिक यांचा प्रवास होत असतो. मात्र खराब दर्जाच्या कामामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार केलेल्या विनंतीनंतरही ठोस पावले उचलली जात नसल्याने परळीकरांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

नागरिकांची ठाम मागणी आहे की, रस्त्यांचे खड्डे तातडीने दर्जेदार पद्धतीने बुजवावेत, जबाबदार ठेकेदारांवर कारवाई व्हावी आणि शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करून सुरक्षित वाहतूक व्यवस्था करावी.

---

सचिव बळीराम नागरगोजे, सह सचिव किशोर जाधव, उपाध्यक्ष राजाभाऊ जाधव, कोषध्यक्ष विष्णू पंत लिखे, प्रसिद्धी प्रमुख नितीन पौळ, संघटक राजेश शिंदे, व्यवस्थापक शाम आवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली अशी माहिती अष्टभुजा सार्वजनिक दुर्गोत्सव चे संयोजक संतोष चौधरी यांनी दिली आहे. आगामी नवरात्र उत्सव हा सांस्कृतिक कार्यक्रम, महिला जनजागृती, समाजउपयोगी उद्देश ठेऊन साजरा करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. या बैठकीला सुजित क्षीरसागर, बाबू भालेराव, कृष्णा कदम, अनंत फल्ले, विश्वनाथ कापसे, केशव जाधव, भागवत दौंड, शिवगण बहादुरे, केशव चौरे, आनंद शिंदे, बाळू गावडे, प्रशांत दराडे, विश्वनाथ सावंत, सोमनाथ पांचाळ, बालाजी क्षीरसाठ, गणेश भालेकर, बंडू कुंभार, केतन जाधव, किशोर कापसे, विशाल जाधव, मुंजा सातपुते, गजानन थळकरी, बालाजी शिंदे, मुंजा उबाळे, बाळू गावड, गोविंद जंगले, रवी खोसे, वैभव सुरवसे, रवी आंधळे, कृष्णा फड, दीपक खाडे, विष्णू आटूळे, शिवहारी जाधव, संदीप दौंड, आकाश लव्हाळे, शिवराज वाकडे, आदी सदस्य उपस्थित होते.

---

प्रश्नांना वाचा फोडून बातम्या प्रकाशित करून जनसामान्यांना न्याय मिळवून दिला. सामाजिक पत्रकारिता सोबतच विकास व शोध पत्रकारितेत त्यांनी माजलगाव तालुक्यातील अन्याय, अत्याचार, सामाजिक प्रश्नावर वाचा फोडण्याचे काम त्यांनी लिखाणाच्या माध्यमातून केले. तसेच ग्रामीण भागातून व बिकट परिस्थितीतून मात करित अभिनेत्री प्राची सोनवणे हिने प्रेमाचा वनवा या लघु चित्रपटात दमदार भूमिका केल्याने या दोघांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र आधार सेना, व दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या संयुक्त विद्यमानाने 2025 चा सत्यशोधक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.माजी पालकमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी विविध क्षेत्रातील झालेला सन्मान निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगितले. पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व क्षेत्रातून कौतुक होत आहे.कार्यक्रमाला योगेश क्षीरसागर, भागवत तावरे, संपादक विजय बम , वसंत मुंडे, गयाबाई आवड, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन, संपादक दिपक थोरात यांनी केले. तर हा सोहळा भव्यदिव्य होण्यासाठी उद्धव आरे, अशोक वाघमारे, सुनील थोरात, आदीने परिश्रम घेतले.

---

विषय ठरली. मंडळाने केलेली ही हटके कल्पना पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्यावर गर्दी केली. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "प्रत्येक वर्षी काहीतरी नवीन करून दाखवण्याचा आमचा प्रयत्न असतो. यंदा मंडळातील तरुणांनी चित्रपटातील 'पुष्पा'ची वेशभूषा साकारून उत्सवाला वेगळी रंगत आणली. नगरवासीयांचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला. शेवटी विसर्जन मिरवणुकीचा समारोप नदीकाठी आरती व महाप्रसादाने झाला.

---

बोंबले सर हे खरेदीसाठी आले असता त्या ठिकाणी त्यांचे 15000 रुपयाचा बटवाच विसरून राहिला. तो बटवा इब्राहिम भाई यांना सापडला आणि ते पंधरा हजार रुपये इब्राहिम भाई यांनी परत केले.सविस्तर वृत्त असे की, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील बेंगलोर बेकरी समोर बाबुराव बोंबले सर खरेदीसाठी आले असता अनावधानाने त्यांचे पंधरा हजार रुपयाचा बटवा त्या ठिकाणी पडला. त्यांच्या लक्षातही आले नाही ते तसेच घरी गेले घरी गेल्यानंतर पाहतो ते पंधरा हजाराचा बटवा खिशात नव्हता सैरावैरा बघू लागले इकडे तिकडे सापडू लागले परंतु बेंगलोर बेकरीच्या समोर आल्याच्या नंतर बेंगलोर बेकरीचे इब्राहिम भाई यांनी त्यांना विचारले काय बघताय त्यावेळेस बोंबले सर म्हणाले विद्यार्थ्यांची फीस जमा केलेला 15300 रुपयाचा बटवा हारवला आहे.त्यामध्ये पंधरा हजार तीनशे रुपये व मुलीचा फोटो आहे अशी खून सांगितल्यानंतर त्यांची सर्व चौकशी करून इब्राहिम भाई यांनी इमानदारीने तो बटवा बोंबले सर यांच्या स्वाधीन केला. खरोखरच इम्रान भाई यांचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. अशी इमानदारी आज कुठे बघायला मिळत नाही हे पंधरा हजार रुपये बोंबले सरांना परत करते वेळेस युवा उद्योजक भानुदास मस्के, इब्राहिम भाई,ओम टिपरे, विजय नाईकवाडे, रवी भंडारे, सह आधी दिसत आहेत.

---

## समाज परिवर्तन करणाऱ्या ग्रंथालयाचे प्रश्न मार्गी लावावेत सचिव,प्रकाश खळगे सर यांची शासनाकडे मागणी.



वडवणी प्रतिनिधी

पुस्तके ग्रंथ ,ग्रंथालय व ग्रंथालयीन कर्मचारी हे संयुक्तपणे समाज परिवर्तनाचे काम प्रभावीपणे करीत आलेले आहेत. पुस्तक वाचनाने, ग्रंथ वाचनाने आणि ग्रंथालयामध्ये येऊन बसल्याच्या नंतर कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून पुस्तकाची देवाणघेवाण करून विद्यार्थ्यांना समाजाला वाचकांना प्रेरणा देऊन समाजामध्ये एक नवचैतन्य निर्माण करण्याचे काम अशा संस्कार केंद्रामधून सतत घडत आहे.शासनाने जवळपास 12 हजारापेक्षा जास्त ग्रंथालयांना शासकीय मान्यता दिलेली आहे. परंतु त्या ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मात्र खूप मोठा संकटाचा सामना करावा लागतो. ग्रंथालय चालकांना सुद्धा ग्रंथ खरेदी, खोली भाडे, वेगवेगळ्या पद्धतीचे कार्यक्रम आणि ग्रंथालीन कर्मचारी यांचे मानधन देण्यासाठी खूप अडचणीला तोंड द्यावे लागते. त्यामुळे ग्रंथालय चालकांची व कर्मचाऱ्यांची फार मोठ्या प्रमाणामध्ये ओढाताण होत आहे. अनेक वर्षापासून ग्रंथालय दर्जा वाढ, ग्रंथालयातील अनुदान वाढ ,कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ, हे प्रश्न बऱ्याच दिवसापासून मागे पडलेले आहेत. त्यामुळे शासनाने ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा ,ग्रंथालय चालकांचा व समाज परिवर्तन करणाऱ्या या संस्कार केंद्राचा सहानुभूतीपूर्वक विचार करून 40टक्के अनुदान वाढ, ग्रंथालयाची दर्जा वाढ, तसेच कर्मचाऱ्यांना किमान वेतन व त्यांना वेगवेगळ्या माध्यमातून संरक्षण देणे आवश्यक आहे. जेणेकरून ते समाजामध्ये प्रभावीपणे समाज परिवर्तनाचा काम करू शकतील ,असे प्रतिपादन छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय मौजे पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड या वाचनालयाचे सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी शासनाला निवेदनाद्वारे केलेले आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या माध्यमातून शासनाला निवेदन देऊन, प्रत्येक तहसील कार्यालयामध्ये ,जिल्हा कार्यालयामध्ये ग्रंथालयीन कर्मचारी व ग्रंथालय चालक यांनी आपापल्या पद्धतीने निवेदन दिलेला आहे ,शासनाने सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रश्न मार्गी लावावीत म्हणून वडवणी तालुक्यातील सर्व ग्रंथालय चालक व ग्रंथालय कर्मचारी यांनी सुद्धा निवेदन देऊन, शासनाला सर्वच प्रश्न मार्गी लावण्याची कळकळीची विनंती या निवेदनाद्वारे केलेली आहे. वडवणी तहसीलचे कर्मचारी यांनी निवेदन घेऊन सदरील निवेदन देणाऱ्या निवेदकाला सन्मानाची वागणूक दिली. व लवकरच तुमची निवेदन आम्ही शासनाला पाठवून पाठपुरावा करू असेही आश्वासन तहसील कर्मचाऱ्यांनी दिल्यामुळे सर्वच ग्रंथालय चालक व कर्मचारी सुखावले होते .या निवेदनावर वडवणी तालुक्यातील जवळपास सर्वच ग्रंथालयाचे कर्मचारी व ग्रंथालय चालक उपस्थित होते. त्यामध्ये प्रकाश तुळशीराम खळगे सर मुंडे मामा,मोहनराव जोशी ,लक्ष्मणराव खोटे,सुरेश जाधव, ई अनेक कर्मचारी उपस्थित होते..या सर्वांच्या वतीने शासनाने प्रश्न मार्गी लावण्याची विनंती करण्यात आली आहे..

---

## कविता

गुड मॉर्निंग मित्रानो, झाली असेलच तुमची सकाळ
ऐका कविता तयार करण्याची कसरत काढून थोडा वेळ
जसे लागतात चहा करायला घटक दुध, साखर
तसे पहिले मांडायचो मुख्य शब्द अन विचार
एक एक विचार येई जस जसा, गाडी थांबून थाबुन टिपे तस तसा
पुढे असे घटनाक्रम जुळवण्याची कसरत
मारतात जसा वरणाला शेवटी तडका तिखट
असे मोठी अर्थ न बदलता यमक जुळवण्याची अट
शोधाव लागते त्या साठी प्रत्येक शब्दाचे समानार्थ
तर कधी बनवाव्या लागतात ओळी फेर सादर, बदलून रुप
उद्देश एकच वाचताना व्हावा बोध, हास्य अन आनंद खूप
वाचक असतात कवीला जसे असतात दुकानदाराला ग्राहक इष्ट
कवितेचा सम्बंध चाल, लय, आकर्षकता अन जिवंततेशी घनिष्ट
मित्रानो तुमच्या आठवणी नेहमी स्मरणात माझ्या राहील
कशी वाटली कविता नक्की सांगा

➡ तुमचाच मित्र, गऊल कपिल (मो 9579106395)



हॅलो बीड
परळी संघर्षनेता
बुधवार दि. 10 सप्टेंबर 2025

# चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशी द्या

## अंबाजोगाईत निषेध मोर्चा

अंबाजोगाई: परळी वैजनाथ रेल्वे स्टेशन परिसरात चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशी द्या अशी मागणी अंबाजोगाईकरांनी केली. यासह विविध मागण्यांसाठी दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने मंगळवारी (दि.9) निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या मोर्चाची सुरुवात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील नामफलकास अभिवादन करून करण्यात आली. निषेधाच्या घोषणा देत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज




चौक मार्गे उपविभागीय कार्यालयावर मोर्चा धडकला. निवेदन देण्यापूर्वी या ठिकाणी निषेध सभा झाली. या सभेत दलित अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने विविध नेते व कार्यकर्ते यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रविवार, दि.31 ऑगस्ट 2025 रोजी रात्री पंढरपूरहून परळी येथे कामाच्या शोधात आलेले एस.सी.मागासवर्गीय समाजाचे एक कुटूंब परळी रेल्वे स्टेशन परिसरात झोपले असता पाच वर्षांच्या मुलीला निर्जन ठिकाणी घेऊन जाऊन तिच्यावर अत्याचार केला आहे. पीडित मुलगी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे उपचार घेत आहे. परळी रेल्वे स्टेशनवर 31 ऑगस्ट रोजी रात्री जे रेल्वे पोलीस ड्यूटीवर होते. तसेच परळी संभाजीनगर पोलीस स्टेशनचे जे कर्मचारी ड्यूटीवर होते. त्यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे सदरील घटना घडली आहे. पान 3 वर

# बंजारा समाजाला एसटी आरक्षण द्या; बीडमध्ये बैठक

## » हैदराबाद गॅझेट लागू करण्यासाठी 15 सप्टेंबरला मोर्चा

बीड, वृत्तसेवा : बीड, पुढारी वृत्तसेवाः हैदराबाद गॅझेट लागू करन बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी समाजबांधव एकवटले आहेत. सोमवारी बीडच्या सौभाग्य मंगल कार्यालयात व्यापक बैठक झाली. यावेळी 15 सप्टेंबर रोजी बीडमध्ये मोर्चा काढून ही मागणी प्रशासनाकडे केली जाणार असल्याचे ठरले.



बीडच्या सौभाग्य मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये समाजबांधवांनी मार्गदर्शन केले. आता लेकरांच्या भविष्यासाठी लढाई सुरु झाली आहे. महाराष्ट्र शासनाने मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेट पान 3 वर

# प्रा. लक्ष्मण हाके यांच्या दौऱ्यादरम्यान मनाई आदेशाचे उल्लंघनप्रकरणी 9 जणांविरुद्ध गुन्हा

गेवराई: बीड जिल्ह्यात प्रा. लक्ष्मण हाके यांच्या दौऱ्या दरम्यान जिल्हाधिकारी यांनी मनाई आदेश जारी केले होते. मात्र, या आदेशाचे उल्लंघन करत गेवराई पोलिस ठाणे हद्दीतील तलवाडा फाटा परिसरात पाचपेक्षा अधिक लोकांची गर्दी जमविण्यात आली. यावेळी जमावातील काही जणांनी झेंड्याच्या दांड्याने एका चारचाकी वाहनाची तोडफोडही केली. ही घटना दि. 7 रोजी घडली असून, या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांनी तातडीने




कारवाई करून परिस्थिती नियंत्रणात आणली. मनाई आदेश लागू असताना झालेल्या या गोंधळामुळे गेवराई पोलिसांनी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कायद्याचा सन्मान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मतभेद असतील, विचारभिन्नता असेल तर त्यासाठी कायदेशीर आणि लोकशाही मार्ग खुले आहेत. दगडफेक, तोडफोड, जमावबंदीचे उल्लंघन हा लोकशाही मार्ग नाही. उलट या माध्यमातून आंदोलनाची नैतिक ताकदच कमी होते. काही पान 3 वर

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन

बीड, दि.09 (जिमाका) : हरित आणि प्रदूषणमुक्त शहराच्या निर्मितीसाठी बीड जिल्हा प्रशासनाने आज एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या मोहिमेमुळे शहराचा सौंदर्यवृद्धीसोबतच पर्यावरण संवर्धनालाही बळकटी मिळणार आहे.



कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः झाडाचे रोप लावून मोहिमेचा शुभारंभ केला. त्यांनी या निमित्ताने शहरातील प्रमुख रस्त्यांच्या डिव्हायडरवर तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या उपक्रमांतर्गत शहराच्या मुख्य रस्त्यांवर व महामार्गालगत हजारो झाडे लावली जाणार आहेत. या वृक्षांमुळे केवळ हिरवळ निर्माण होणार नाही, तर हवेतील प्रदूषण कमी होणे, उन्हाळ्यातील उष्णता नियंत्रित राहणे, नागरिकांना शुद्ध हवा मिळणे आणि जैवविविधतेत वाढ होणे अशा अनेक स्तरांवर लाभ होणार आहेत. आपल्या मनोगतात पान 3 वर

# संपादक नितीन ढाकणे यांचा सर्वत्र वाढदिवस साजरा



दैनिक अतुल्य महाराष्ट्र चे संपादक नितीन ढाकणे यांचा दि. 8 सप्टेंबर रोजी वाढदिवस मित्रपरिवारांच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळेस जुगलकिशोर बाहेती, पत्रकार धनंजय अरबुने, इंजि. भगवान साकसमुद्रे, श्रीराम लांडगे, श्रीमंत खांडेकर, परमेश्वर मुंडे, स्वानंद पाटील,संतोष आघाव, मयूर अरबुने, शिक्षक लक्ष्मण वैराळ, आदी उपस्थित होते.

# आदर्श शिक्षक पुरस्कार 2025'' ने श्रीमती मुंडे कल्पना संजीवन सन्मानित

परळी | प्रतिनिधी

शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात अखंड दीप प्रज्वलित करत हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश फुलवणाऱ्या श्रीमती मुंडे कल्पना संजीवन यांना बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने "आदर्श शिक्षक पुरस्कार 2025" ने सन्मानित करण्यात आले.



गेल्या पंधरा वर्षांपासून त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला जीवनध्येय मानून कार्य केले आहे. फक्त पुस्तकी ज्ञानापुरते न थांबता प्रत्यक्ष कृतीतून संकल्पना स्पष्ट करणे, सहशालेय उपक्रमांतून आत्मविश्वास वाढवणे, पर्यावरण संवर्धनातून सामाजिक जाणीव रुजवणे, तसेच वंचित घटकातील मुलांसाठी शिक्षणाची वाट मोकळी करणे— या कार्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच ओळख प्राप्त झाली आहे.

श्रीमती मुंडे यांनी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दरवाजे सदैव खुले ठेवले. त्यांच्या प्रयत्नांतून आजवर पान 3 वर

# भागवत कथा श्रवण केल्याने माणसाला मोक्षप्राप्ती होते – ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे

## » संगम येथे श्रीमद्भागवत कथेच्या दुसऱ्या दिवसाचे कथेत भाविक मंत्रमुग्ध



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) संगम (ता. परळी) येथे सुरु असलेल्या श्रीमद्भागवत कथेचा दुसरा दिवस आज मंगळवार रोजी उत्साहात आणि भक्तिभावात संपन्न झाला. या प्रसंगी भागवताचार्य ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे (संगमकर) यांच्या ओजस्वी व हृदयस्पर्शी भागवत कथेमध्ये संपूर्ण गाव भक्तिरंगात रंगून गेले.

कथेच्या सुरुवातीलाच जनाई महाराजांनी भागवत महात्म्याचे वर्णन करताना सांगितले की – "भागवत कथा श्रवण केल्याने माणसाला मोक्षप्राप्ती होते. मात्र ते श्रवण एकचित्ताने, मनोभावे व आत्मीयतेने केले पाहिजे. सनक, सनंदन, सनातन व सनद कुमारांच्या वैराग्यकथेतून आपल्याला भक्तीचा खरा अर्थ समजतो. पान 3 वर

# बीड शहर बचाव मंच व एसडीपीआय पार्टी चे जिल्हाधिकारी, एस पी साहेब, न.प मुख्याधिकारी यांना तातडीचे निवेदन

## 17 सप्टेंबर पर्यंत शहरातील तातडीची कामे, तात्काळ करण्यात यावीत

बीड प्रतिनिधी : बीड शहर बचाव मंच व एस डी पी आय पार्टी, कम्युनिस्ट पार्टी च्या वतीने येत्या 17 सप्टेंबर 2025 मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील तातडीची कामे तात्काळ उरकवून घ्यावीत यासाठी जिल्हाधिकारी साहेब, एस पी साहेब व मुख्याधिकारी नगरपरिषद या तिघांनाही निवेदने देण्यात आली. 17 सप्टेंबर पर्यंत शहरातील तातडीची कामे तात्काळ करण्यात यावीत अशी आग्रही विनंती करण्यात आलेली आहे. ही सर्व कामे प्राधान्याने चालू



आहेत व लवकरच पूर्ण करण्यात येतील असे प्रशासनाच्या वतीने आश्वस्त करण्यात आलेले आहे. बीड शहरातील रस्ते, नाल्या पथदिवे, कचरा व नालेसफाई, बंद घंटागाड्या, वाहतूक व्यवस्था या सर्व समस्यांमुळे बीड शहराची परिस्थिती अतिशय दयनीय व हलाखीची झालेली आहे. शहरातील सर्व भागातील सर्व स्तरातील नागरीक अतिशय त्रस्त झालेले आहेत. नागरिकांच्या समस्यांना व सहनशक्तीला पान 3 वर

# केज येथे रस्त्यावर हरणाचे मुंडके, मांस आढळल्याने खळबळ



केज : केज शहरातून जात असलेल्या एका रोडवर मृत हरणाचे मुंडके सापडल्याने खळबळ उडाली आहे. सोमवारी (दि. 8) दुपारी 12 च्या सुमारास केज येथून बोबडेवाडीकडे जात असलेल्या रोड लगतच्या मस्जिद जवळच्या रोडवरील गतिरोधकाजवळ एक हरिणाचे मुंडके आणि त्याच्या मांसाचे तुकडे आढळून आले. याची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर गुप्तवार्ता पान 3 वर

# खड्डेमय रस्त्यांवरून परळीकरांचा संताप!

## » निकृष्ट दर्जाच्या कामावर अँड. मनोज संकाये यांचा नगरपालिकेला जाब : "नागरिकांचा जीव धोक्यात का?"





परळी वैजनाथ प्रतिनिधी शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, या खड्ड्यांमुळे अपघातांची मालिका सुरूच आहे. सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी आवाज उठवत बातमीद्वारे संबंधित नगरपालिका प्रशासनाकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर खड्डे बुजवण्याचे काम सुरु झाले; मात्र हे काम केवळ थातुर-मातुर पद्धतीने केल्याने परिस्थितीत काहीही बदल झालेला नाही. पान 3 वर

# अष्टभुजा सार्वजनिक दुर्गोत्सवची कार्यकारणी जाहीर

## » अध्यक्षपदी योगेश नाईकवाडे तर कार्याध्यक्षपदी गोविंद गरड यांची सर्वानुमते निवड





परळी (प्रतिनिधी): परळी शहरात संस्कृती आणि भक्तीची परंपरा जपणाऱ्या अष्टभुजा सार्वजनिक दुर्गोत्सव च्या अध्यक्षपदी योगेश नाईकवाडे तर कार्याध्यक्षपदी गोविंद गरड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

सोमवार दी 8 सप्टेंबर रोजी रात्री 9 वाजता गंगासागर नगर मधील गायत्री मंदिर येथे अष्टभुजा सार्वजनिक दुर्गोत्सवच्या सदस्यांची संस्थापक मार्गदर्शक मोहन राजमाने व जेष्ठ नागरिकांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली. या बैठकीत अष्टभुजा सार्वजनिक दुर्गोत्सव 2025 ची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. कार्यकारणी पुढील प्रमाणे पान 3 वर

# पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे सत्यशोधक पुरस्कारने सन्मानित!

माजलगाव / प्रतिनिधी :-

महाराष्ट्र आधार सेना सामाजिक संघटना व दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या संयुक्त विद्यमानाने यांच्याकडून उल्लेखनिय कार्य केल्याने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 6 सप्टेबर शनिवार रोजी बीड येथील स्व. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह या ठिकाणी मा.पालकमंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व योगेश क्षीरसागर, गयाबाई आवाड, संपादक विजय बंब, संतोष मानूरकर यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना सत्यशोधक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




पत्रकार आडागळे यांनी गेली पंधरा वर्षापासून विविध पान 3 वर

# माजलगावात शिव छत्रपती गणेश मंडळाचा जल्लोष

## नवनाथ नगरात 'पुष्पा'च्या वेशभूषेत गणेशोत्सवाला रंगत

माजलगाव / प्रतिनिधी : नवनाथ नगर येथील शिव छत्रपती गणेश मंडळाने यंदाचा गणेशोत्सव हटके अंदाजात साजरा केला. गणेश विसर्जनाच्या दिवशी मंडळातील तरुणांनी लोकप्रिय चित्रपट 'पुष्पा' मधील नायकाचा अवतार धारण करून नगरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.



"पुष्पा नाम सुनके फ्लॉवर समजले का?" या स्टाईलमध्ये तयार केलेली वेशभूषा आणि त्यासोबत दिलेल्या दमदार डायलॉग्समुळे मिरवणूक रंगून गेली. स्थानिक तरुणांनी लाल शर्ट, लुंगी, गॉगल व पुष्पा स्टाईलचा लूक साकारत 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात धमाकेदार एन्ट्री केली. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी टाळ्यांचा वर्षाव केला. ढोल–ताशांच्या गजरात, लेझीमच्या तालावर आणि पुष्पाच्या डान्स स्टाईलमध्ये सादर केलेल्या अभिनयामुळे विसर्जन मिरवणूक नगरात चर्चेचा पान 3 वर

# बेंगलोर बेकरीचे इब्राहिम भाई यांच्या इमानदारीचे सर्वत्र कौतुक



वडवणी प्रतिनिधी,

वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये बेंगलोर बेकरी दुकान आहे याच बेंगलोर बेकरीच्या शेजारी भानुदास मस्के यांचे मिसळ पावचे मोठे हॉटेल आहे. बेंगलोर बेकरी समोर पान 3 वर